**<u>ठळक बातम्या</u>**

- आधुनिक तंत्रज्ञानात हृदयरोग निदान आणि उपचार क्षेत्रात क्रांतिकारी बदल घडवून आणण्याच सामर्थ्य असल्याचं राज्यपाल रमेश बैस यांचं प्रतिपादन
- स्वतंत्र, निष्पक्ष आणि प्रलोभनांपासून मुक्त निवडणूका निश्चित करण्यासाठी निरिक्षकांनी ताळमेळ राखून काम कराव असं मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांचं आवाहन
- वित्तमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखालील ५२ व्या जीएसटी परिषदेला नवी दिल्ली इथं सुरवात
- सिंगापूर इथं मागील दोन आठवड्यात दर दिवशी दोन हजार कोविड रुग्ण आढळून येत असल्याची सिंगापूरचे आरोग्य मंत्री ओंग ये कुंग यांची माहिती

  **आणि**

- चीनमधील हांगझोऊ इथ सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताची विक्रमी घोडदौड/ २५ सुवर्ण, ३५ रौप्य आणि ४० कांस्य अशी १०० पदके जिंकून भारत चौथ्या स्थानावर

**<><><><><>**

कार्डियाक इमेजिंग सारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे हृदयरोग निदान आणि उपचारामध्ये क्रांतिकारी बदल झाले असून लाखो लोकांना त्यामुळे जीवनदान मिळत आहे तसच रुग्णांच्या जीवनाची गुणवत्ता सुधारत आहे. मात्र २० ते ३० वयाच्या युवकांमध्ये दिसून येणारे हृदयविकार ही चिंतेची बाब असून, ते थांबवण्यासाठी हृदयविकार तज्ज्ञांनी समाजाला मार्गदर्शन कराव, अस प्रतिपादन राज्यपाल रमेश बैस यांनी आज इथ केलं.

'कार्डियाक इमेजिंग आणि  क्लिनिकल कार्डिओलॉजी' या विषयावरील तिसऱ्या जागतिक परिषदेच उदघाटन राज्यपाल बैस यांच्या हस्ते काल मुंबई इथं करण्यात आलं  त्यावेळी ते बोलत होते.

उदघाटन सत्राला अणुऊर्जा नियामक मंडळाचे अध्यक्ष आणि अणुशास्त्रज्ञ दिनेश कुमार शुक्ला, कार्डियाक इमेजिंग वर्ल्ड कॉंग्रेसचे अध्यक्ष डॉ सी एन मंजुनाथ, वर्ल्ड फेडरेशन ऑफ कार्डियाक इमेजिंग अँड क्लिनिकल कार्डिओलॉजीचे अध्यक्ष डॉ जी एन महापात्रा, इंदूरच्या श्री अरबिंदो इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेसचे संस्थापक डॉ विनोद भंडारी तसेच राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय प्रतिनिधी उपस्थित होते.

इमेजिंग सारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञान पद्धती सामान्य रुग्णांकरिता खर्चिक असून, या चाचण्यांसाठी लागणारी वैद्यकीय उपकरणांची निर्मिती विदेशात होत असते.  ही  आधुनिक वैद्यकीय उपकरणे देशात तयार झाली तर इमेजिंग चाचण्यांचा खर्च कमी होईल, अस राज्यपालांनी सांगितल. हृदयरोग आणि  त्याचा रोगनिदान खर्च आयुष्मान भारत सारख्या योजनेतून मिळाला तर त्याचा गरीब कुटुंबांना मोठा फायदा होईल अस हि  राज्यपाल म्हणाले. संयुक्त राष्ट्र लोकसंख्या निधीच्या ताज्या अहवालानुसार सन २०५० पर्यंत भारतात वरिष्ठ नागरिकांची संख्या ३४ कोटी ७ लाख  इतकी असेल. त्या दृष्टीने नागरिकांना पुरेशा प्रमाणात हृदयरोग चिकित्सा सुविधा मिळाव्या तसच ग्रामीण भागातील रुग्णांना आधुनिक टेली मेडिसिन आणि  टेली रेडिओलॉजीचा कसा वापर करता येईल, याबाबत विचार विनिमय करावा अशी सूचना राज्यपालांनी केली.

हृदयरोगांमुळे होणाऱ्या मृत्यूंपैकी एक- तृतीयांश मृत्यू चाळीशीच्या आतील व्यक्तींचे  होत आहेत. वाढत्या हृदय विकारांमागे हवेतील प्रदूषण हे देखील एक

कारण असल्याच वर्ल्ड कॉंग्रेसचे अध्यक्ष आणि हृदयरोग तज्ज्ञ डॉ सी आर मंजूनाथ यांनी यावेळी सांगितले.

यावेळी राज्यपालांच्या हस्ते 'कार्डियाक इमेजिंग अपडेट - २०२३' या पुस्तकाचे तसेच परिषदेच्या स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले.

**<><><><><>**

प्रसिद्ध कृषी शास्त्रज्ञ प्रोफेसर एमएस स्वामीनाथन यांनी कृषी क्षेत्रात दिलेल्या योगदानाबद्दलच्या आठवणींना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज आपल्या लेखातून उजाळा दिला. स्वामिनाथन यांनी केलेल्या कार्यामुळे भारताला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण केलं असल्याचं मत मोदी यांनी व्यक्त केलं. देशानं एक दूरदर्शी व्यक्ती गमावला असून, ज्यांच योगदान नेहमीच सुवर्णाक्षरांनी कोरलं जाईल असं प्रधानमंत्री  मोदी यांनी आपल्या लेखामध्ये म्हटलं आहे. प्रा. स्वामीनाथन यांच्या गहू संशोधनातल्या अग्रगण्य कार्यामुळे गव्हाच्या उत्पादनात लक्षणीय वाढ झाली असल्यांचं त्यांनी म्हटलं आहे. आज जग बाजरी किंवा श्रीअन्न यांना सुपरफूड म्हणून संबोधत आहे, परंतु प्रा. स्वामीनाथन यांनी १९९० च्या दशकापासून बाजरीचं महत्व अधोरेखित केलं होतं. या लेखात प्रा. स्वामीनाथन यांच्याशी यांच्याशी झालेल्या संवादाबाबत सांगताना त्यांनी मृदा आरोग्य कार्ड योजनेबाबत मौल्यवान मार्गदर्शन केल्याचं सांगितलं.

**<><><><><>**

जीएसटी अर्थात वस्तू आणि सेवा कर परिषदेची ५२वी बैठक वित्तमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्ली इथं सुरु झाली. यामधे

केंद्रीय वित्त राज्य मंत्री पंकज चौधरी, राज्य आणि केंद्र शासित प्रदेशांचे वित्तमंत्री तसचं केंद्र आणि राज्य सरकारच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

**<><><><>**

निवडणूका निष्पक्ष पद्धतीनं झाल्या पाहिजेत आणि ते दिसून आलं पाहिजे. स्वतंत्र, निष्पक्ष आणि प्रलोभनांपासून मुक्त निवडणूका  निश्चित करण्यासाठी निरिक्षकांनी ताळमेळ राखून काम कराव असं आवाहन मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी केलं आहे. ते काल मिझोराम, छत्तीसगढ, मध्यप्रदेश, राजस्थान आणि तेलंगणातल्या आगामी विधानसभा निवडणूकीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या निरिक्षकांच्या बैठकीत बोलत होते. निरिक्षकांनी निवडणूकीचे पावित्र्य राखून सर्व पक्षांना समान संधी देण्याची भूमिका घ्यावी असंही त्यांनी सांगितलं. निरीक्षक हे निवडणूक आयोगाचे महत्वाचे अंग असून त्यांनी निर्भय वातावरणात निवडणूका व्हाव्यात यासाठी मनापासून काम करावे. असंंही ते म्हणाले. निवडणूक आयोग ८० वर्षांहून अधिक वयाच्या, दिव्यांग आणि दुर्गम भागातल्या लोकांना घरातून मतदान करता येईल किंवा त्यांना मतदान केंद्रावर आणण्याची व्यवस्था देण्यावर लक्ष केंद्रित करत आहे असंही त्यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><>**

सिंगापूरचे आरोग्य मंत्री ओंग ये कुंग यांनी देशात कोरोनाची लाट आल्याचं म्हटलं आहे. कोरोनाच्या सक्रिय रुग्णांची संख्या मागील तीन आठवड्यात दैनंदिन एक हजार होती, ती आता मागील दोन आठवड्यात दोन हजारावर गेली आहे. कोरोना ओमिक्राॅन वेरिअंट ईजी.५ आणि एचके.३ या विषाणू मुळे रुग्ण वाढ झाल्याचं ते म्हणाले. सध्या कोणतेही निर्बंध घालण्यात आले  नसून ज्येष्ठ नागरिक आणि आजारी लोकांनी काळजी घेण्याचं आवाहन ओंग ये कुंग यांनी  केलं.

**<><><><><>**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल मुंबईतल्या गोरेगाव इथल्या  एका निवासी इमारतीला लागलेल्या आगीतील मृतांच्या नातेवाईकांना प्रत्येकी पाच लाख रुपयांची भरपाई जाहीर केली. तसेच जखमींना शासकीय खर्चाने वैद्यकीय उपचार देण्याची घोषणा केली. मुख्यमंत्री शिंदे यांनी काल हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे ट्रॉमा केअर सेंटरला भेट दिली आणि उन्नत नगर, गोरेगाव इथल्या  जय भवानी एसआरए इमारतीला लागलेल्या आगीत जखमी झालेल्या नागरिकांची विचारपूस केली. या घटनेची सखोल चौकशी करून पुढील कारवाई करण्यात येणार असल्यांचं मुख्यमंत्र्यांनी माध्यमांना सांगितलं. एसआरए सारख्या इमारतींचे फायर ऑडिट त्वरीत करण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

**<><><><><>**

चीनमधील हांगझोऊ  इथ सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताने १०० पदकं मिळवली आहेत. २५ सुवर्ण, ३५ रौप्य आणि ४० कांस्य अशी एकूण १०० पदके जिंकून भारत चौथ्या स्थानावर असून, आतापर्यंतची  सर्वोत्तम कामगिरी आहे. आज सकाळी महिलांच्या कबड्डी आणि तिरंदाजी कंपाऊंड स्पर्धेत भारताने सुवर्णपदक जिंकले.

भारतीय महिला कबड्डी संघाने चिनी तैपेईचा २६-२५ असा रोमहर्षक पराभव करत देशासाठी शंभराव पदक जिंकलं. आज दुपारी सुवर्णपदकासाठी पुरुष कबड्डी संघाचा इराणशी सामना होईल तिरंदाजीमध्ये ओजस देवतळे याने आज पुरुषांच्या वैयक्तिक अंतिम स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले, तर अभिषेक वर्माला रौप्यपदक मिळाले.

दोन तिरंदाजांमधल्या अंतिम सामन्यादरम्यान अंतिम गुणांमध्ये केवळ दोन गुणांचा फरक होता. आज सकाळी महिलांच्या वैयक्तिक तिरंदाजी सामन्यांमध्ये ज्योती सुरेखा वेन्नमनं सुवर्ण आणि अदिती गोपीचंद स्वामीने कांस्यपदक जिंकलं. आशियाई क्रीडा स्पर्धेत विक्रम नोंदवत ज्योतीनं अंतिम फेरीत दक्षिण कोरियाच्या सो सीचा १४९-१४५ अशा फरकानं पराभव केला. अदितीनं इंडोनेशियाच्या रतिह फादलीविरुद्ध १४६-१४० अशा फरकानं विजय मिळवला. कुस्तीचे सामनेही सुरू झाले आहेत. पुरुषांच्या फ्री स्टाईलमध्ये ७४ किलो वजनी गटात यश, ८६ किलो वजनी गटात दीपक पुनिया, ९७ किलोमध्ये विकी आणि १२५ किलो वजनी गटात सुमित रिंगणात उतरणार आहेत. बॅडमिंटन पुरुष दुहेरीच्या अंतिम फेरीत, चिराग शेट्टी/सात्विक साईराज रँकीरेड्डीची जोडीचा आज सामना होईल. महिला हॉकीमध्ये आज दुपारी ब्राँझपदकासाठी प्लेऑफ सामना होणार आहे. यामध्ये भारत आणि जपानचे संघ आपली ताकद दाखवतील.

**<><><><><>**

अशियाई स्पर्धेत शंभरपेक्षा अधिक पदकं पटकावणाऱ्या भारतीय एथलेटिक चमूचं प्रधानमंत्री नरेन्द्र मोदी यांनी अभिनंदन केलं आहे. समाजमध्यमावर प्रसारित केलेल्या आपल्या संदेशात त्यांनी म्हटलं आहे की भारतासाठी ही एक अविस्मरणीय कामगिरी आहे. १०० पदकं मिळवल्याबद्दल संपूर्ण देशचं रोमांचित झाला आहे. क्रीडा आणि माहिती आणि प्रसारण मंत्री अनुराग ठाकुर यांनीही भारतीय एथलेटिक चमूचं अभिनंदन केलं आहे. आज नवी दिल्लीत प्रसार माध्यमांशी बोलतांना ते म्हणाले की हे सारे खेळाडू भविष्यातल्या खेळांडूंसाठी प्रेरणास्थान आहेत. यंदाच्या अशियाई खेळांमध्ये भारतीय खेळाडूंनी अनेक

जागतिक विक्रम मोडीत काढून नवे अशियाई विक्रम प्रस्थापित केल्याचंही ते म्हणाले.

//<><><><><>//